# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १५६–२०१०/ दिनांक :

श्री. श्रीकांत उर्फ आप्पासो मलेशाप्पा बिराजदार ,
मु. पो. उटगी (लमाणताडा), ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. श्रीकांत उर्फ आप्पासो मलेशाप्पा बिराजदार, मु. पो. उटगी (लमाणताडा), ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द मंचाकडे तक्रार दि. १६.७.२०१० रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी शेतीपंपास ३ अश्वशक्ती नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी वितरण कंपनीच्या कवठे महांकाळ विभागांतर्गत संख उप विभागाकडे अर्ज देवून प्रोसेसिंग फी रु.५०/– दि. १९.५.२०१० रोजी पावती क्रमांक ५३४३५३३ ने भरलेले आहेत, परंतु त्यांना चलन देण्यात आले नाही. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र.१३१ दि. २६.५.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे.

अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ६३१३ दि. २९.५.२०१० नुसार आदेश पारीत करुन कृती मानके साध्य करण्यात अपयश आलेस ग्राहक भरपाई द्यावी असे आदेश दिले. त्याच्या नाराजीने सदरची तक्रार मंचाकडे प्रतिधीमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.८.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी वीज पुरवठा मिळावा म्हणून दि. १९.५.२०१० रोजी प्रोसेसिंग फी भरलेली आहे. त्यांना दि. १४.७.२०१० रोजी चलन देण्यात आलेले आहे. त्यांचे ०.१८ कि.मी. चे लघुदाब वाहिनीचे काम आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १७.८.२०१० रोजी सुनावणी घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे यांचे म्हणण्यानुसार दि. १८.६.२०१० ला चलन देणे आवश्यक होते ते दि. १४.७.२०१० ला देण्यात आले आहे. तक्रारदार यांनी दि. २२.७.२०१० ला पैंसे भरले आहेत. चलन मिळण्यास २६ दिवसांचा म्हणजे ४ आठवड्यांचा विलंब झालेला आहे, त्यामुळे ४ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ४००/– भरपाई देण्यात यावी अशी मागणी केली. वि.प.तर्फे विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही.

अंतर्गत कक्ष सांगली यांचे आदेश दि. २९.५.२०१० ला झाले आहेत तरीही वि.प.ने तक्रारदार यांस दि. १४.७.२०१० ला चलन दिले आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार १ महिन्यात चलन देणे आवश्यक होते. त्यामुळे दि. १८.६.२०१० ते १४.७.२०१० या २६ दिवसांच्या म्हणजे ४ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ४००/– भरपाई देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे व ती मिळण्याचा तक्रारदाराची हक्क आहे. दुर्दैवाने वि.प. विलंबापोटी कुठलेही लेखी/ तोंडी म्हणणे देवू शकले नाही. कृती मानकाचा भंग झाला आहे, त्यामुळे वि.प.ला भरपाई देण्याशिवाय पर्याय नाही,त्यांची ती जबाबदारी आहे. खालील प्रमाणे आदेश –

## <u>आदेश</u>

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीचा कवठे महांकाळ विभाग / संख उप विभाग यांनी तक्रारदार यांस कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयश आल्याने दि. १८.६.२०१० ते १४.७.२०१० या २६ दिवसांच्या कालावधीतील विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु.४००/– भरपाई ग्राहकास द्यावी.

३) सदरची रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित करण्यात यावी.

४)  सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच  व विद्युत लोकपाल ) विनियम २००६  ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५)  या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे  करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार  )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार  )
अध्यक्ष

c